# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, लातूर

Office : 02382-250634
Fax :- 02382-251866
E-mail:- celatur@mahadiscom.in

महावितरण

Office of the Exe. Engr. CGRF
Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli,
Latur – 413512

EE/CGRF/LTR/163

Date :- 06.11.2019

**ग्राहक तक्रार क्र.** : १९/२०१९
**तक्रार दाखल दिनांक** : २०.०९.२०१९

**प्रति,**

**१) श्री. प्राचार्य. योगेश्वरी महाविद्यालय**
**अंबाजोगाई.**
ता. अंबाजागाई. जि. बीड.

२. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
उप-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उपविभाग, अंबाजोगाई.

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. १९/२०१९ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन श्री. प्राचार्य. योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडलेली आहे.

6.11.19
**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**
१) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**
१) अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, बीड
२) कार्यकारी अभियंता (प्र), म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, बीड
३) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, अंबाजोगाई

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर

ग्राहक तक्रार क्रमांक : १९/२०१९ ( दाखल दिनांक : २०.०९.२०१९ )

श्री. प्राचार्य, योगेश्वरी महाविद्यालय

अंबाजोगाई. ता. अंबाजोगाई जि. बीड --ग्राहक अर्जदार

-- विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

उप-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उपविभाग, अंबाजोगाई -- गैरअर्जदार

| कोरम : | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पंडितराव बी. मोरे | : | अध्यक्ष |
| | श्री. सुधीर भाऊराव देशमुख | : | सदस्य |
| | श्री. जी. एन. गायकवाड | : | सचिव |

## निकाल

**दि. ०६.११.२०१९**

ग्राहक अर्जदार, "श्री. प्राचार्य. योगेश्वरी महाविद्यालय" अंबाजोगाई (ग्राहक क्र. ५७१०१००७९४३५) यांनी त्यांची तक्रार 'अ' फॉर्ममध्ये दि. २०.०९.२०१९ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे. त्यानुसार ग्राहकाचे असे म्हणणे आहे की,

२) सप्टेंबर २०१७ पासून १५KW झालेल्या सौर उर्जा प्रकल्प (NET METERING) सह. मा. कार्यकारी अभियंता, अंबाजोगाई यांच्या परवानगीने कार्यान्वित करण्यात आला. सुरवातीचे काही महिने म्हणजेच ऑक्टोंबर २०१७ ते एप्रिल २०१८ मध्ये वापरानुसार विद्युत बिल येत होते. अचानक मे - २०१८ महिन्यापासून विद्युत बिल कोणत्याच प्रकारची मीटर रिडींग न घेता केवळ अंदाजे तत्वावर आकारण्यात सुरुवात होऊन मे - २०१८ महिन्याचे ५७१६ युनिट वापराचे बिल रु. ५६,९२८/- हे केवळ अंदाजे स्वरुपात देण्यात आले. याबाबत विचारणा केली असता कुठल्याही प्रकारचे समाधानकारक उत्तर महावितरण कंपनी, अंबाजोगाई यांच्याकडून देण्यात आलेले नाही. यानंतर सुध्दा सातत्याने केवळ अंदाजे स्वरूपात पूढील महिन्याचे वीज बिल आकारण्यात आले. महावितरण कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांना वेळोवेळी भेटून संबंधित चुकीचे विद्युत बिल सुधारणा करण्यासंबंधित विनंती घेतली.

यानंतर नाईलाजास्तव जुन - २०१८ महिन्यात चुकीच्या पध्दतीने आकारण्यात आलेल्या वीज बील संदर्भात वीज बिल दुरुस्तीबाबत विनंती अर्जनुसार मा. कार्याकारी अभियंता, अंबाजोगाई यांच्याकडे सादर केला. यावर कसल्याही प्रकारची कार्यवाही न होता सातत्याने पुढील महिन्याचे केवळ अंदाजे स्वरुपात वीज बिल व्याजासह आकारण्यात आलेली आहेत. याबाबत सातत्याने (Import and export

reading) कळविण्याबाबत मा. उपकार्यकारी अभियंता व मा. कार्यकारी अभियंता यांच्याकडे विनंती अर्ज सादर करण्यात आलेले असून त्याबाबत कसलेही लेखी उत्तर संस्थेस देण्यात आलेले नाही. या सर्व व्याजासह बिलाची रक्कम आज रु. ०१,२९,६६०/- इतकी झाली असून, आज महावितरणकडे संस्थेकडून जमा असणात्या Banked units ची संख्या २८६१ आहे.

३) महावितरण विभागाच्या विद्युत कायदा २००३ कायद्यातील कलम क्र. ५६ नुसार ग्राहकाच्या विद्युत पुरवठा तोडण्यापूर्वी आवश्यक असणारी लेखी नोटीस किंमान पंधरा दिवसाच्या मुदतीसह) दि. १४.०९.२०१९ रोजी प्राप्त झाली. परंतु दि. १८.०९.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता ग्राहकास कुठलीच बाजु मांडण्याची संधी न देता विद्युत पूरवठा अन्यायकारकरित्या खंडित केला. त्यामुळे.त्यावेळी चालू असलेली व तद्नंतरची शैक्षणिक कार्यक्रम बंद करावे लागले. विद्यार्थ्यांचे मोठ्याप्रमाणात शैक्षणिक नुकसान झाले असून विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भिती निर्माण झाली आहे. हे सर्व मुद्दे उपस्थित करुन ग्राहकातर्फे विनंती करण्यात आली की, हे सर्व मुद्ये उपस्थित करुन ग्राहकाने विनंती केली की :-

अ) ग्राहकास दुरुस्त विद्युत देयक देण्यात यावे.

ब) खंडित विजपूरवठा ताबडतोब जोडुन देण्यात यावा.

क) ग्राहकास नुकसान भरपाई देण्यासाठी महावितरणला आदेश द्यावेत.

४) गैर अर्जदार महावितरण तर्फे श्री. सुनील बळीराम मस्के, उप. कार्यकारी अभियंता, (प्रभारी), उपविभाग अंबाजोगाई यांनी त्यांची बाजु अशी मांडली की :- सदर ग्राहकाचे जानेवारी २०१९ मध्ये डिसेंबर २०१८ अखेर त्यांचे Import रिडींग २२७२८ असून त्याच वेळी Export रिडिंग १३७५७ इतकी होते. यावरुन सदर दोन्ही रिडींग या त्यांच्या Solar roof top च्या Date of installation commissioning पासून (सप्टेंबर २०१७) डिसेंबर २०१८ पर्यंतच्या असल्यामुळे सदर काळामध्ये Import मध्ये export वजा केले व त्याचे actual consumption हे २२७२८-१३७५७=८९७१ युनिट्स हे सदरच्या काळामध्ये (२२ महिने) विभागून ४९,६२२.३१/- रु. एवढी रक्कम कमी करुन बिल या ग्राहकाला देण्यात आले. कारण एवढे युनिट्स या महाविद्यालयाने महावितरणकडून घेऊन वापरले आहेत. या काळात महावितरणला ग्राहकाच्या सोलर सेलने या शिवाय कोणतेही युनिट्स दिलेले नाहीत. यानंतरही त्यांच्या बिलाचे योग्य ते मुल्यमापन करुन रु. ४९,६२२.३१/- कमी केले आहेत. तसेच योग्य त्या कामाची नोटीस दिली नाही. असे सन्माननिय ग्राहकाचे म्हणणे आहे. परंतु ग्राहकाला अनेकदा नोटीस दिल्या आहेत. त्यापैकी दि.१५.०८.२०१९ ला १६ वाजून २२ मिनिटांनी त्यांना त्यांच्या रजीस्टर्ड मोबाईल क्रमांक ९४२३७१५३६७ यावर दिलेल्या नोटीसचा Extract या सोबत या कार्यालयास अवलोकनार्थ सादर केला आहे. वीज पूरवठा खंडित करताना महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही अरेरावीची भाषा ग्राहकास उद्देशुन केलेली नाही. हे सर्व मुद्दे उपस्थित करुन महावितरण तर्फे विनंती करण्यात आली की, ग्राहकाची तक्रार रद्द करण्यात यावी.

## निष्कर्ष

५) उभय पक्षाने उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेण्यात आले. त्याचप्रमाणे दोन्ही पक्षकारांनी दाखल केलेले कागदपत्रांचे अवलोक करण्यात आले. सकृत. दर्शनी मंचाचा असे निदर्शनास आले की, या केस मध्ये महावितरणकडून कोणत्याही प्रकारची चुकीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अ) सर्वात प्रथम ग्राहकातर्फे मुद्दा मांडण्यात आला तो असा की, त्यांचे विद्युत कनेक्शन गैरकायदेशिररित्या दि. १८.०९.२०१९ रोजी महावितरण तर्फे खंडित करण्यात आले. या उलट उपल्बध कागदपत्र पाहता विजपूरवठा खंडित करण्यात येणार आहे अशी सुचना ग्राहकास त्यांनी महावितरणकडे नोद केलेल्या मोबाईल क्रमांक ९४२३७१५३६७ वर दि.१५.०८.२०१९ रोजी देण्यात आली होती. असे असतानासुध्दा ग्राहक सदर सुचना मिळाळी नाही असे सांगत आहे. वास्तवीक पाहाता नोंद केलेला मोबाईल क्रमांक कार्यान्वित ठेवणे हे ग्राहकाचे काम आहे त्यात कसूर झाल्यास त्याच्या परिणामांची जिम्मेदारी महावितरणवर येत नाही. या कारणास्तव मंचाचे असे ठाम मत आहे की, ग्राहकाचा विज पूरवठा खंडित करण्या कामी महावितरण कडून कोणतही चुक झालेली नाही.

ब) या केस मधील दुसरा मुद्दा असा की, उभय पक्षामध्ये कोणाकडून किती येणे बाकी आहे. याबद्दलचे बिल महावितरण तर्फे देण्यात आले होते. सदर ग्राहकाचे जानेवारी २०१९ मध्ये डिसेंबर २०१८ अखेर त्यांचे Import रिडींग २२७२८ असून त्याच वेळी Export रिडिंग १३७५७ इतकी होते. यावरुन सदर दोन्ही रिडींग या त्यांच्या Solar roof top च्या Date of installation commissioning पासून (सप्टेंबर २०१७) डिसेंबर २०१८ पर्यंतच्या असल्यामुळे सदर काळामध्ये Import मध्ये export वजा केले व त्याचे actual consumption हे २२७२८-१३७५७=८९७१ युनिट्स हे सदरच्या काळामध्ये (२२ महिने) विभागून ४९,६२२.३१/-रु. एवढी रक्कम कमी करुन बिल या ग्राहकाला देण्यात आले. कारण एवढे युनिट्स या महाविद्यालयाने महावितरणकडून घेऊन वापरले आहेत. या काळात महावितरणला ग्राहकाच्या सोलर सेलने या शिवाय कोणतेही युनिट्स दिलेले नाहीत. यानंतरही त्यांच्या बिलाचे योग्य ते मुल्यमापन करुन रु. ४९,६२२.३१/-कमी केले आहेत. ही गोष्ट स्पष्टपणे सांगते की, महावितरणकडून बिल देण्यामध्ये कोणतीही चुक झालेली नाही. याउलट महावितरणने ग्राहकाचे हित लक्षात घेऊन येणे रक्कम विभागुन दिले आहे. अन्यथा ग्राहकास जास्त दराचा भूर्दंड सोसावा लागला असता. ग्राहकाने वापरले विज व ग्राहकाने तयार केलेली विज याचा अभ्यास केला असता असे दिसुन आले की, ग्राहकाने निर्मान केलेल्या विजपेक्षा ८९७१ युनिट जास्त वापरले आहेत. अशा परिस्थिती मध्ये महावितरणला दोषी धरता येणार नाही. ग्राहकातर्फे या मुद्यास सलग्न असा दुसरा मुद्दा उपस्थित करण्यात आला तो असा की, ग्राहकाने वापरलेले युनिट्स व निर्माण केलेले युनिट्स याचा हिशोब करण्यात यावा व त्याबाबतचे दुरुस्ती बिल ग्राहकास देण्यात यावे. याबाबत मंचाचे असे ठाम मत आहे की, हा मुद्दा याक्षणी विचारात घेता येणार नाही. त्यासाठी ग्राहकास मार्च २०२० पर्यंत वाट पहावी लागेल. दरम्यानच्या काळात ग्राहकाने वापरलेल्या युनिट्सपेक्षा जास्त युनिट तयार केली असल्यास त्याचा विचार Banked units म्हणुन अंतिम हिशोब करताना मार्च २०२० मध्ये विचारात घेता येईल.

क) ग्राहकाने उपस्थित केलेला तीसरा मुद्दा असा आहे की, त्यांचा विज पूरवठा विनाकारण खंडित करण्यात आला होता. ही बाब मंचाच्या समोर आल्यानंतर मंचातर्फे दि. २०.०९.२०१९ रोजी त्वरीत आदेश पारित करण्यात आला व त्यानुसार महावितरण तर्फे ग्राहकाकडून रु. ५०,०००/- जमा केल्यानंतर त्वरीत विजपूरवठा जोडून देण्यात आला. विज पूरवठा खंडित केला त्यावेळेस ग्राहकाकडे थकबाकी होती. या कारणास्तव विज पूरवठा खंडीत केलेल्या कारणास्तव महावितरणकडून कोणतीही नुकसान भरपाई ग्राहकास मागता येणार नाही.

# आदेश

१) ग्राहक अर्जदाराची 'अ' फॉर्म मधील तक्रार रद्द करण्यात येत आहे.

२) ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय अमान्य असल्यास मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत 'ब' फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सादर करु शकतात. फॉर्म 'ब 'या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल

महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,

प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,

नागपूर-४४००१३.

दुरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८

ठिकाण : - लातूर

दिनांक :-०६.११.२०१९

6.11.19     6-11-19     6/11/19

| अध्यक्ष | सदस्य | कार्यकारी अभियंता/सचिव |
|---|---|---|
| ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर. |